ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# स्त्री-भ्रूणहत्या : महिला मानवाधिकाराचे उल्लंघन - एक अभ्यास

**डॉ. जयश्री अनिल आयरेकर**

प्राचार्य, श्री. भिमाशंकर बी.एड. कॉलेज, लांडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे

## सारांश

*भारतीय संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतीपैकी एक आहे. मुल्ये, कुटूंबव्यवस्था, स्त्रीला प्राचीन काळापासून मिळणारा मानसन्मान हा जगाच्या दृष्टीने कुतूहलाचा विषय आहे. 'यत्र नार्यस्तु पुज्यते, रमन्ते तत्र देवतः' असे सुभाषित आपल्याकडे आहे. गार्गी, मैत्रेयी सारख्या प्राचीन काळातील विदुषीपासून ते राणी लक्ष्मीबाई, डॉ आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले ते अलीकडच्या काळातील प्रतिभाताई पाटील, सुनिता विल्यम्स, मेरी कोम, लता मंगेशकर अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांनी आपल्या कर्तृत्त्वाची चुणूक जगाला दाखवून दिली आहे. असे असतानाही देशात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रात स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल ढासळतो आहे ही चिंतेची बाब आहे. सुदृढ, निरोगी समाजाच्या जडणघडणीसाठी स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल नैसर्गिकरित्या राखणे आवश्यक आहे. मात्र अलिकडच्या काळात अत्याधुनिक तंत्राज्ञानाच्या माध्यमाचा चुकीचा वापर करून हा समतोल कृत्रिमरित्या ढासळवला जात आहे. स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी समाजामध्ये जाणीवजागृती होणे गरजेचे आहे. स्त्रियांचे हक्क हे मानवी हक्क असल्याने कायद्याच्या संरक्षणाची जबाबदारी ही शासनाची ठरते. या दृष्टीकोनातून स्त्रियांना शिक्षणाद्वारे योजना व कायदे यांची जाणीव करून देणे आवश्यक ठरते.*

**Keywords :** *स्त्री-भ्रूणहत्या, प्रतिबंध, महिला सक्षमीकरण, जाणीवजागृती*

**प्रस्तावना :**

जगण्याचा अधिकार हा माणसाला निसर्गाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. नैसर्गिक न्यायाची संकल्पना ही खरे तर ह्या अधिकारावरच आधारलेली आहे. जगण्याचे स्वातंत्र्य हा

माणसाचा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि म्हणून हा अधिकार इतर सर्व मानव अधिकारांचा स्त्रोत आहे. मानवी अधिकार ही संकल्पना मानवाच्या जीवनाशी व त्याच्या अधिकाराशी संबंधित आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची जोपासना केली जाते. मानवी अधिकार हा जन्मसिद्ध हक्क असल्यामुळे तो जन्मतः प्रत्येकाला मिळत असतो. समाजात जन्माला येण्याचे प्रत्येक व्यक्तीला त्याचे स्वातंत्र्य दिले जावे मग ती स्त्री असो वा पुरुष जगण्याचा अधिकार ही संकल्पना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाची आहे.

निसर्गाने पुरुषाला जसा जगण्याचा अधिकार दिला आहे, तसा तो स्त्रीला देखील दिला आहे. सगळ्यांना सारखाच आणि समान अधिकार हा समतेचा स्त्रोत आहे. 'जगा आणि जगू द्या' या सूत्रावर मानव अधिकार आधारलेले आहेत. मला प्राप्त झालेला अधिकार हा इतरांचा देखील अधिकार आहे, याची मला जाणीव हवी. या जाणीवेतच बंधुभावाचे मूळ आहे. बंधुभाव हा माणसामाणसाला जोडतो. त्यांच्यात जवळीक निर्माण करतो आणि त्यांच्यात भावनात्मक नाते निर्माण करतो.

मुलगी जन्मली तर तिने घालून दिलेल्या बंधनात मुकाट मान खाली घालून जगावे याची तजवीज केली जाते. महिलांच्या अनुपस्थितीत कुटूंब आणि समाजाच्या अतिरिक्त कल्पना करू शकत नाही. त्यामुळे थोडे उशीरा का होईना पण स्त्रियांना समानतेची वागणूक मिळत आहे. असे असले तरी स्त्रीचा पती हयात असणे याला सुद्धा समाजात महत्त्वाचे मानले जाते. अशा स्त्रीला विधवा म्हणून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी करून घेत नाहीत. परंतु काळाच्या ओघात या अटी कुठेतरी शिथील झालेल्या दिसतात. अनेक क्षेत्रात आजही महिलांना प्रवेश नाही. कित्येक ठिकाणी एकाच कामासाठी पुरुष व स्त्रियांना वेगवेगळा मोबदला मिळतो. कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण हा तर स्वतंत्र व बेचैन करणारा विषय आहे. गँगरेप, लहान बालकांवर होणारे अत्याचार एवढेच नव्हे तर पोटाची खळगी भरण्यासाठी शरीर विकावं लागण्यासारखी नामुष्कीही पत्करावी लागते. बाजारात उभ्या राहाव्या लागणा-या स्त्रियांचे माणूसपण मुळात नाकारले जाते. तिथे त्यांना मानवी अधिकार आहेत व ते पायदळी तुडविले जात आहेत याची कल्पना ही ह्या स्त्रीयांना नसते. जिथे अन्यायाची परिसीमा तिथे आपल्या संवेदना अशा बोथट झालेल्या असताना बलात्कारासारख्या घटना या विसरूनच जायच्या असतात व बलात्कारीत बाईलाच दुषणे द्यायची असतात, असे संकेत रुळले तर नवल काय?

लिंगाच्या आधारावर स्त्री पुरुष विषमता आहे. समाजातील दर्जा हा लिंगावरच आधारित असल्यामुळे स्त्री ही चार भिंतीच्या आत राहणे आणि चुल आणि मुल यापुरतेच तिला मर्यादित ठेवले आहे. त्यातुन स्त्री पुरुष प्रमाण पाहिले तर स्त्रियांची संख्या घटत चाललेली आहे. स्त्रीला जन्मापासून अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. कुटूंबात जन्माला आलेल्या मुलीला मुलापेक्षा

कमी लेखले जाते. मुलगा हा वंशाचा दिवा म्हणून त्याला प्रत्येक बाबतीत स्वातंत्र्य दिले जाते. त्यामुळे स्त्रीला अगदी सुरुवातीपासून समस्यांना तोंड द्यावे लागते. या सगळ्याचे मूळ स्त्री भ्रूणहत्येमधेच आहे.

प्रस्तुत लेखातून स्त्री-भ्रूणहत्या प्रतिबंधाबाबत जाणीवजागृती करणे, महिला सबलीकरणासाठी शासनाच्या योजना, कायदे यांची जाणीव करून देणे हा हेतू आहे.

**उद्दिष्टे :**

१. स्त्रियांच्या विकासातील समस्या अभ्यासणे

२. महिला सबलीकरणासाठी संविधानात्मक योजना अभ्यासणे

३. स्त्री-भ्रूणहत्या प्रतिबंधाबाबत शासनाची व स्वयंसेवी संस्थांची भूमिका अभ्यासणे

४. स्त्री-भ्रूण हत्या प्रतिबंधाबाबत जाणीवजागृतीसाठी उपाययोजना सूचविणे

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी गुणात्मक संशोधनातील दस्ताऐवज पृथःकरण या अभ्यासपद्धतीचा अवलंब केला आहे.

**माहिती संकलनाची साधने व विश्लेषण :**

स्त्री-भ्रूणहत्या प्रतिबंधनाबाबत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागाचे अहवाल, महिला व बालविकास विभागाचे अहवाल, आरोग्य विभागाचा अहवाल, कायदा व सामाजिक न्याय विभागाचा अहवाल, Census Report, शासकीय संकेतस्थळांवरील माहिती, विविध पुस्तके, मासिके व नियतकालिके यांच्या आधारे माहिती संकलित करून तिचे गुणात्मक विश्लेषण केले आहे.

**स्त्री विकासातील समस्या :**

भारतात स्त्रीयांना विकासात विविध अडचणींना सामोरे जावे लागते त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे.

**१) कुपोषण :** जगात सर्वात जास्त लहान मुलांची संख्या भारतात आहे. त्यातही कुपोषित मुलांची संख्या जास्त आहे. याचे कारण त्यांना गर्भावस्थेतच योग्य प्रमाणात पौष्टिक आहार मिळत नाही. भारतात ब-याच ठिकाणी अशी परंपरा आहे की, स्त्रीला सर्वांची जेवणे झाल्यावर उरलेसुरले जेवावे लागते. ती गर्भवती असताना सुद्धा तिच्या बाबतीत कडक नियम लागू असतातच. ती कुपोषित बालकाला जन्म देते व असे हे चक्र सुरूच राहते. अलीकडे याबाबतीत काही सुधारणा झालेली दिसून येते.

**२) आरोग्याची समस्या :** गरीब स्त्रियांना आरोग्याच्या सुविधा पुरुषांच्या तुलनेत कमी व उशीरा मिळतात. त्यांना वेळेवर डॉक्टरकडे नेण्यात येत नाही. तिची प्रकृती जास्तच खालावल्यावर

तिच्याकडे लक्ष दिले जाते. स्वतःहून ती डॉक्टरकडे जात नाही. निर्णय तिचा पती किंवा सासू घेते. प्रसुतीच्या वेळेस ज्या अडचणी येतात, त्यांचा इलाज होण्याआधीच हजारो महिला मृत्युमुखी पडतात. स्त्री ज्या वातावरणात काम करते, ते प्रदूषणयुक्त असल्याने तिचे स्वास्थ खालावते. काही ठिकाणी अजुनही चुल व स्टोव्हवर स्वयंपाक केल्याने मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साईड तिच्या फुफ्फुसात जातो, जो स्वास्थासाठी हानिकारक आहे.

**३) शिक्षणाचा अभाव :** अजुनही काही ठिकाणी मुलांच्या तुलनेत माता-पिता मुलींच्या शिक्षणावर कमी खर्च करतात. तिला जास्त शिकविण्याची त्यांना गरज वाटत नाही. कधी कधी शाळेत तिचे शोषण होईल या भीतीने वयात आल्यावर तिला घरातच ठेवले जाते. शिकून तिला नव-याच्या घरी जायचे आहे, तिचे शिकणे आपल्या उपयोगाचे नाही असाही विचार केला जातो.

**४) कामाचे ठिकाणी ताणतणाव :** संपूर्ण जगात असे दिसून आले आहे की, स्त्री ही पुरुषापेक्षा जास्त तास काम करते. तरीही ते काम दुर्लक्षित केले जाते. भारतात अनेक गावांमध्ये स्त्रियांना ४-५ मैल चालून डोक्यावर हंड्यांमध्ये पाणी आणावे लागते, शेतात जास्त कष्टदायक कामे स्त्रियाच करतात, शहरात कार्यालयीन काम करून सुद्धा तिला स्वयंपाक, कपडे धुणे, भांडी घासणे, घराची स्वच्छता ठेवणे, मुलांची व वृद्ध व्यक्तींची देखभाल करणे इ. कामे करावी लागतात. त्याचसोबत कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडून दिली जाणारी अपमानास्पद वागणूक, मानसिक अवहेलना कित्येक स्त्रिया दररोज अनुभवतात. यातून येणा-या ताणतणावाचा तिच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थावर परिणाम होताना दिसून येतो.

**५) शारीरिक, मानसिक शोषण :** अलीकडे काही वर्षात स्त्रियांवरचे अत्याचार वाढले आहेत. ज्यात बलात्कार, हुंडाबळी, मारपीट, अपमान, उपाशी ठेवणे इ. चा समावेश आहे. हिंसेच्या भीतीने ती आयुष्यभर दबावात जीवन जगते. भ्रूणहत्या आणि गर्भाची लिंग परीक्षा करून तिला गर्भपात करायला भाग पाडणे हा तिच्या शारीरिक व मानसिक शोषणाचाच प्रकार आहे, ज्यामुळे तिचा सामाजिक स्तर घसरतो.

**स्त्री-भ्रूणहत्या :** स्त्री-भ्रूणहत्या ही वर्तमानकाळातील समस्या संपूर्ण समाजाला ग्रासली आहे. गरीब श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित सर्व पातळीवर स्त्री-भ्रूणहत्येच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे आणि स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे हा खरा चिंतेचा विषय बनला आहे. उच्चभ्रू समजल्या जाणा-या व शिक्षित असलेल्या समाजात स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण वाढतच आहे. गरीब व अशिक्षित लोकांचा विचारच करायला नको! सध्या देशात एक हजार पुरुषांमागे ९२७ मुली आहेत. स्त्री-पुरुषातील विषमतेचे प्रमाणच उद्या अनेक प्रश्नांना जन्म देणार आहे. देशात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रात स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल ढासळतो आहे ही चिंतेची बाब आहे. सुदृढ, निरोगी समाजाच्या जडणघडणीसाठी स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल नैसर्गिकरित्या राखणे आवश्यक आहे.

मात्र अलिकडच्या काळात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमाचा चुकीचा वापर करून हा समतोल कृत्रिमरित्या ढासळवला जात आहे.

**स्त्री-भ्रूणहत्येची कारणे :**

१. आज समाजामध्ये वंशाचा दिवा म्हणून मुलगा हवा असतो. त्यामुळे 'हम दो हमारे दो' या नुसार एक अपत्य मुलगा असावा अशी लोकांची विचारसरणी असते व मुलासाठी अट्टाहास करणारे स्त्री-भ्रूणहत्या करतात.

२. काही स्त्रिया या स्त्री भ्रूणहत्येच्या विरोधात आवाज उठवत नाही. कारण तसे केल्यास त्या आपल्या सर्वस्वाला, नव-याला, घराला मुकतील व त्यांचा संसार मोडेल याची भीती त्यांच्या मनात असते.

३. काही स्त्रियांचीही विचारसरणी मुलगाच हवा अशी असते.

४. म्हातारपणाची काठी म्हणून मुलाकडे पाहिजे जाते व आपल्याला म्हातारपणी सांभाळणारा मुलगा हवा, यासाठी ते स्त्री-भ्रूणहत्या करतात.

५. मुलगा म्हणजे वारसदार, आपले नाव चालविणारा अशी विचार सरणी स्त्री-भ्रूणहत्या करण्यास कारणीभूत होते.

**महिला सबलीकरणासाठी संविधानात्मक योजना :** अलीकडच्या काळात शासनासमवेत अनेक स्वयंसेवी संस्था सक्रियपणे स्त्री-भ्रूणहत्या थांबविण्यासाठी योगदान देताना दिसत आहेत. महिलांना सन्मानाने जगता यावे, त्यांना आपले कर्तृव्य सिद्ध करण्याची पुरेपूर संधी मिळावी या दृष्टीने शासनाने अनेक पावले उचलली आहेत.

महाराष्ट्र शासनाने देशात पहिल्यांदा १९९४ साली महिला धोरणाची अंमलबजावणी केली. २००१ मध्ये नवीन महिला धोरण तयार करण्याच्या कामाला वेग आला आहे. महिलांना आर्थिक तसेच सामाजिकदृष्ट्या सक्षम बनविल्यास, त्यांना समाजात मानसन्मान आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्यास या समस्येवर प्रभावीपणे मात करता येईल. महिला सक्षमीकरणाचे अनेक मार्ग शासनाने उपलब्ध केले आहेत.

१. शासकीय सेवेमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण दिले आहे. (आधार - महाराष्ट्र, वार्षिकी, २०११) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांना शासकीय कामासाठी एस.टी ने मोफत प्रवासाची सुविधा देण्यात आली. जिल्हा परिषदांमार्फत व्यवसाय प्रशिक्षण, समुपदेशन केंद्रे, मोफत कायदेशीर सल्ला, शिलाई मशीनचे वाटप, कार्यशाळा इ. योजना राबविल्या जात आहेत.

२. राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी होत आहे. यामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान मजुरी, औषधोपचाराची सोय, दुखापत

होवून हातापायाला प्लॅस्टर लावले असल्यास त्या कालावधीकरीता मजुरीची निम्मी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येते. तीन वर्षाखालील मुलांना सांभाळण्यासाठी दाईची व्यवस्था, काम करताना अपंगत्व आल्यास अपंगत्त्वाच्या प्रमाणानुसार किंवा जास्तीत जास्त ५० हजार रुपयांपर्यत अनुदान देण्यात येते. प्रसुतीपूर्व कालावधीसाठी सानुग्रह अनुदान दिले जाते.

३. महिला बचत गटांना ४ टक्के कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यासोबतच बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ मिळावी म्हणून तज्ज्ञ बाजारपेठ संस्थेची नियुक्ती, तसेच विविध देशातील हस्तकौशल्याच्या वस्तू शिकण्यासाठी बचत गटांचे परदेश अभ्यासदौरे ग्रामविकास विभागातर्फे आयोजित केले जातात.

४. राज्यात हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ ची अंमलबजावणी होत आहे. त्याअंतर्गत सर्व गुन्हे दखलप्रात्र आहेत. या गुन्ह्यांसाठी अटकपूर्व जामीन मिळत नाही.

५. कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ मधील तरतुदीनुसार लैंगिक छळवणूक हे गैरवर्तन मानले असून कार्यालयाच्या ठिकाणी महिलेचा लैंगिक छळ होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित अधिकारी/कर्मचा-याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येते त्यादृष्टीने प्रत्येक कार्यालयात महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

६. महिला आणि बालकांचा अनैतिक कारणासाठी होणारा मानवी व्यापार थांबविण्यासाठी राज्यात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ ची अंमलबजावणी होत आहे. त्या अंतर्गत प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकिय सुविधा, अन्न, वस्त्र, निवा-याची सुविधा देण्यात येते.

७. राज्यात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ अन्वये स्त्रियांना घरगुती याचापासून संरक्षण देणे, महिलेचा घरात राहण्याचा हक्क अबाधित राखणे, महिलेला घरात सन्मानाची, न्यायाची वागणूक मिळावी यासाठी कायदेशीर उपाययोजना आहेत. कौटुंबिक हिंसाचार हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा ठरविण्यात आला आहे.

**स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी कायदे :** मुलींचा जन्मदर कमी होण्यामागे बदलत चाललेली मानसिकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भाचे लिंग निदान करून स्त्री-भ्रूणहत्येचे वाढलेले प्रमाण यामुळे चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. हा मुलींचा जन्मदर असाच घटत राहिला तर सामाजिक संतुलन बिघडण्याची शक्यता निर्माण होईल. ही बाब विचारात घेवून शासनाने कायद्याचा आधार घेतला आहे. केंद्रशासनाने प्रसवपूर्व निदान तंत्राच्या दुरुपयोगाला आळा

घालण्याच्या तसेच स्त्रीलिंगी गर्भाची हत्या थांबविण्याच्या उद्देशाने २० सप्टेंबर १९९४ पासून संपूर्ण देशभर प्रसवपूर्व निदान तंत्र दुरुपयोग प्रतिबंध अधिनियम लागू केला. महाराष्ट्रात हा कायदा १९८८ मध्येच लागू करण्यात आला.

१. या कायद्यान्वये शासनमान्य संस्थांकडून काही विशिष्ट अटींवरच उदा. गर्भवती महिलेचे पूर्वी अचानक गर्भपात झाले असल्यास, महिलेचे वय ३५ पेक्षा अधिक असेल, जंतूदोषाचा परिणाम, कुटूंबात एखाद्यात मानसिक व शारीरिक व्यंग असल्यास प्रसवपूर्व निदान करता येते.

२. कायद्याचा भंग केल्यास व आरोप सिद्ध झाल्यास ज्या संस्थेमध्ये निदान केले त्या संस्थाप्रमुखास व तिथे नोकरी करणा-या मानसेवी तत्त्वावर काम करणा-या व्यक्तीस तीन वर्षांची कारावासाची व १० हजार रुपये दंडाची शिक्षा होवू शकते; तर नंतर प्रत्येक गुन्ह्यासाठी ५ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा व ५० हजार रुपयांचा दंड होऊ शकतो.

३. गुन्हेगार नोंदणीकृत वैद्यकिय अधिका-याची नोंदणी प्रथमतः ५ वर्षासाठी तर दुस-या वेळेस नेहमीसाठी नोंदणी रद्द करण्यात येते.

४. प्रसवपूर्व लिंगनिदान तंत्राचा दुरुपयोग होवू नये म्हणून तालुका, जिल्हा, राज्य पातळीवर दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

५. सोनोग्राफी केंद्रात गर्भलिंग चाचणी येथे केली जात नाही याचा बोर्ड लावणे बंधनकारक केले आहे.

स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी कायदा आहे. शिक्षेची तरतूद आहे. या कायद्यान्वये सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रावर बंधने घालण्यात आली. कायद्याची कडक अंमलबजावणी तर झालीच पाहिजे. त्या जोडीला समाजाची मानसिकता बदलणे हा यावरील कायमस्वरूपी उपाय म्हणता येईल. शासनासोबतच अनेक स्वयंसेवी संस्था सक्रियपणे याला पाठींबा देताना दिसून येतात.

१. राज्यात ब-याच जिल्ह्यांमध्ये 'लेक वाचवा' अभियान राबविले जात आहे. त्या अंतर्गत ज्या घरात मुलगी जन्माला आली त्या मातेचा सत्कार, डोव्हाळ जेवण, समारंभपूर्वक बाळंतविडा पाठविणे, प्रत्येक घरावर सेव्ह गर्ल अभियानाचे स्टिकर्स लावणे, भिंतीवर लेक वाचवा या अभियानातील म्हणी लिहिणे या बाबी होताना दिसून येतात.

२. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने 'जागर जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकिंचा' या पाच वर्षीय उपक्रमाचे आयोजन केले आहे. या अंतर्गत सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव ते पुणे अशी पदयात्रा काढण्यात आली. यादरम्यान स्त्री-भ्रूण हत्या करू नका असा संदेश देणारे अनेक उपक्रम सादर झाले.

**निष्कर्ष :**

१. स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी शासनाने कायदा केला आहे. त्या अन्वये सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रावर बंधने घालण्यात आली आहेत. स्त्रियासांठी आर्थिक स्वावलंबन, समानता आणि सामाजिक संरक्षणाच्या योजना शासनाने आखल्या आहेत.

२. स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी 'लेक वाचवा', 'जागर जाणिवांचा' अशासारखे उपक्रम स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून राबविले जाताना दिसून येतात. (www.savethebabygirl.com)

३. स्त्रियांना स्त्रियांसाठी असणा-या योजना व कायदे यांची पुरेशा प्रमाणात माहिती असलेली दिसून येत नाही.

**उपाययोजना :**

१. स्त्रिया आज विविध क्षेत्रांत आघाडीवर असून त्या पुरुषांपेक्षा अधिक क्षमतेने समाजात वावरत आहेत. स्त्रियांना समान हक्क व समान अधिकार तसेच सन्मान घरातूनच पुरुषांनी द्यायला हवेत.

२. आर्थिकदृष्ट्या कमकुवत घरात मुलीचा जन्म झाल्यास गावातील सधन व्यक्तींनी, स्वयंसेवी संस्था यांनी पुढाकार घेवून मुलीच्या पालनपोषनाचा व शिक्षणाचा खर्च करता येईल.

३. ग्रामपंचायत, पंचायतसमित्या, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात जन्मलेल्या मुलींच्या नावावर विशिष्ट रक्कम ठेव ठेवण्यासाठी नियोजनात तरतूद करता येईल.

४. सामान्य नागरिकांना बेकायदेशीरपणे गर्भलिंग, निदान व DCPNDT कायद्यातील तरतुदींची माहिती मिळण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना करता येईल.

५. ठिकाठिकाणी मेळावे, शिबीरे, चर्चासत्र, चित्ररथ, पथनाट्य, निबंधस्पर्धा यांच्यामाध्यमातून जनजागृती व्हावी.

**समारोप :** सामाजिक समतेसाठी सामाजिक स्वास्थासाठी स्त्री आणि पुरुषांची संख्या समान असणे, सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक विकासात स्त्रियांना समान स्थान असणे, समान अधिकार तिला प्रदान करणे हे आज अत्यावश्यक झाले आहे. स्त्री-भ्रूणहत्या थांबविण्यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीबरोबरच स्त्रीयांसोबत पुरुषांनीही एकत्रितपणे जनजागृतीमध्ये सहभाग घेतला तरच ख-या अर्थाने स्त्री-पुरुष प्रमाणाचा नैसर्गिक समतोल राखण्यात आपण यशस्वी होवू व सामाजिक विषमतेचा अंधार दूर करू.

**संदर्भ :**

१. मुळे, सुरेखा (२०११) '**तिला वाचवा...भविष्य घडवा**', लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.

२. चंद्रसेन, तुरकर (२०११) '**महिला कायदे व अधिकार**', युनिसेफ महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन.
३. गायकवाड, वर्षा (२०११) **गर्भजल परिक्षण अधिनियम अहवाल,** महिला व ग्रामविकास मंत्रालय, महाराष्ट्र शासन.
४. फौजिया खान (२०११) **स्त्री-भ्रूण हत्या संदर्भात आरोग्य विभागाचा अहवाल,** आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन.
५. www.savethebabygirl.com
६. www.censusofindia.2011
७. www.amchimulgi.com